# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१
E-mail : desk19@dtemaharashtra.gov.in   Web : www.dtemaharashtra.gov.in

परिपत्रक :

क्रमांक : १९/डीटीई/परदेशी शिष्यवृत्ती/२०१८/१८०

दिनांक : ६ ऑगस्ट, २०१९

विषय : उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" या योजनेंतर्गत सन २०१९-२० करीता शिष्यवृत्ती निवडीसाठी अर्ज स्विकृतीच्या मुदत वाढीबाबत...

संदर्भ : शासन पत्र उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक: संकीर्ण-२०१९/प्र.क्र.२६९/तांशि-४ दिनांक ६ ऑगस्ट, २०१९

दिनांक ०४ ऑक्टोबर, २०१८ च्या शासन निर्णयान्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" योजना जाहीर करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिताची जाहिरात दिनांक २२ जून, २०१९ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. अर्ज online पद्धतीने करावयाचे असून अर्ज करण्याची वाढीव मुदत दिनांक २९ जुलै २०१९, सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत होती. तसेच online भरलेल्या अर्जाची प्रत व आवश्यक प्रमाणपत्र व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती विभागीय कार्यालयास सादर करण्याकरिताची वाढीव मुदत दिनांक ३१ जुलै २०१९, सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत होती. संदर्भिय शासन पत्रान्वये सदरची मुदत आता विद्यार्थ्यांना online पद्धतीने अर्ज करण्यासाठी शेवटची संधी म्हणून दिनांक २९ जुलै २०१९ वरून दिनांक १५ ऑगस्ट, २०१९ अशी करण्यात येत आहे. तसेच online भरलेल्या अर्जाची प्रत व आवश्यक प्रमाणपत्र व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती संबंधित विभागीय कार्यालयास सादर करण्याकरिताची मुदत दिनांक ३१ जुलै, २०१९ वरून दिनांक १९ ऑगस्ट, २०१९ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री नागदिवे
Issue Notice

(डॉ. सुरेश वायलकर)
प्र.सहसंचालक, तंत्र शिक्षण,
म.रा., मुंबई

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :

१) संचालक, उच्च शिक्षण पुणे
२) सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर
३) सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई/पुणे/जळगाव/नांदेड/पनवेल/कोल्हापूर/सोलापूर/नागपूर/औरंगाबाद/अमरावती

1799
दिनांक:- 09 AUG 2019